**मुंबई शहरांतील उपकर प्राप्त इमारतींच्या पुनर्विकासासाठी विकास नियंत्रण नियमावली ३३(७) अंतर्गत प्राप्त होणारे प्रस्ताव स्विकारण्याची कार्यपध्दती.**

---

**जा.क्र.मुअ/निकाअ/वि.नि.नि.३३(७)/न.क्र.४८/४५३/दुवपु-१३ दि.१४.०१.२०१३**

---

**परिपत्रकः-**

**संदर्भः-**मा.उपाध्यक्ष तथा मुकाअ/प्रा.यांनी दि.३१.१२.२०१२ व ७.१.२०१३ रोजी झालेल्या विभाग प्रमुखांच्या बैठकीत दिलेले निर्देश.

मुंबई शहरांतील उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासासाठी मालमत्ताधारक/विकासक हे विकास नियंत्रण नियमावली ३३ (७)अंतर्गत पुनर्विकासाचे प्रस्ताव थेट त्या त्या विभागाच्या कार्यकारी अभियंता यांच्या कार्यालयात सादर करतात. या कार्यालयाच्या असे निदर्शनास आले आहे की, सादर केलेले प्रस्ताव हे कांही प्रमाणात अपूर्ण असल्यामुळे कार्यकारी अभियंता यांच्या कार्यालयात प्रलंबित रहातात. तसेच कार्यकारी अभियंता यांच्या कार्यालयातर्फे प्राप्त झालेल्या प्रस्तावाची छाननी करण्यास बराच कालावधी लागतो. कार्यकारी अभियंता यांच्यातर्फे प्रस्तावाची छाननी झाल्यानंतर सदर प्रस्ताव संबंधित उपमुख्य अभियंता यांना सादर करण्यांत येतात. परंतु असे निदर्शनास आले आहे की, उपमुख्य अभियंता यांच्या कार्यालयामध्येसुध्दा प्रस्तावांची छाननी करण्यास विलंब होतो. या कारणास्तव उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासास विलंब होतो.

उपरोक्त बाबीवर मा.उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी/प्राधिकरण यांचे अधिपत्याखाली दि.३१.१२.२०१२ व ७.१.२०१३ रोजीच्या झालेल्या विभाग प्रमुखांच्या बैठकीत चर्चा झाली असता, मा.उपाध्यक्ष/प्राधिकरण यांनी असे निर्देश दिले आहेत की, यापुढे विकास नियंत्रण नियमावली ३३ (७)अंतर्गत प्राप्त होणारे पुनर्विकासाचे प्रस्ताव कार्यकारी अभियंता/दुवपु यांचे कार्यालयात न स्विकारता प्राप्त होणारे प्रस्ताव हे मुख्य अधिकारी/दुवपु यांच्या कार्यालयात स्विकारण्यात यावेत.

जेणेकरुन प्राप्त झालेल्या प्रस्तावांची विभागवार नोंद तथा माहिती उपलब्ध राहील व प्रस्ताव वेळेत निकाली काढण्यावर नियंत्रण ठेवणे शक्य होईल.

वर नमूद वस्तुस्थिती लक्षात घेता,सर्व कार्यकारी अभियंता/दुवपु यांना, असे निर्देश देण्यांत येतात की, विकास नियंत्रण नियमावली ३३ (७) अंतर्गत प्राप्त होणारे पुनर्विकासाचे प्रस्ताव हे यापुढे त्यांनी त्यांच्या कार्यालयात स्विकारु नयेत. यापुढे सदर प्रस्ताव स्विकारण्यासाठी खालीलप्रमाणे कार्यपध्दती अवलंबिण्यांत यावी.

१. मालमत्ताधारक/विकासक हे विकास नियंत्रण नियमावली ३३(७) अंतर्गत पुनर्विकासाचे प्रस्ताव मुख्य अधिकारी/दुवपु यांच्या आवक विभागात (Inward Section) सादर करतील.

२. सदर प्रस्ताव संबंधित उप अभियंता/शाखा अभियंता यांचेकडे प्राप्त झाल्यानंतर, प्रस्ताव परिपूर्ण आहे किंवा कसे, याची खात्री करावी व प्रस्ताव परिपूर्ण असल्यास संबंधित कार्यकारी अभियंता यांचे कार्यालयाकडे निवासी कार्यकारी अभियंता/दुवपु यांचे स्वाक्षरीने पुढील कार्यवाहीसाठी पाठवावा. परंतु जर प्राप्त झालेल्या प्रस्तावात कांही त्रृटी आढळल्यास तसेच कागदपत्र अपूर्ण असल्यास, संबंधित उप अभियंता/शाखा अभियंता यांनी सदर प्रस्ताव पुन्हा निवासी कार्यकारी अभियंता यांचे स्वाक्षरीने त्यांची पूर्तता करण्यासाठी मालमत्ताधारकाकडे/विकासकाकडे परत पाठवावा. सदर कार्यवाही **३** दिवसांचे आंत करावी व पाठविलेल्या प्रस्तावांची वेगळी नोंद ठेवावी.

३. संबधित कार्यकारी अभियंता यांनी प्राप्त झालेल्या प्रस्तावांची शासन गृहनिर्माण विभागाने दि.१६.८.२०१० रोजी निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार विनाविलंब छानना करावी. छाननी पूर्ण करण्यासाठी खालीलप्रमाणे कालमर्यादा निश्चित करण्यांत येत आहे.

   i] उपकरप्राप्त इमारतींमध्ये भोगवटादारांची संख्या ही १००पर्यंत असल्यास कमाल एक महिना

   ii] उपकरप्राप्त इमारतींमध्ये भोगवटादारांची संख्या ही २००पर्यंत असल्यास कमाल दीड महिना

   iii] उपकरप्राप्त इमारतींमध्ये भोगवटादारांची संख्या ही २०० हून अधिक असल्यास कमाल दोन महिने

प्रस्तावाची छाननी झाल्यानंतर सदर प्रस्ताव संबंधित उपमुख्य अभियंता यांचेकडे सादर करावा.

४. संबंधित उपमुख्य अभियंता यांनी प्राप्त झालेल्या प्रस्तावाची शासन गृहनिर्माण विभागाने दि.१६.८.२०१० रोजी निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार

विनाविलंब छाननी करुन प्रस्ताव मुख्य अधिकारी/दुवपु मंडळ यांचे कार्यालयात सादर करावा. त्याकरिता पुढीलप्रमाणे कालमर्यादा निश्चित करण्यांत येत आहे.

i] उपकरप्राप्त इमारतींमध्ये भोगवटादारांची संख्या ही १००पर्यंत असल्यास कमाल पंधरा दिवस

ii] उपकरप्राप्त इमारतींमध्ये भोगवटादारांची संख्या ही १००हून अधिक असल्यास कमाल एक महिना

५. निवासी कार्यकारी अभियंता/दुवपु यांनी शासन गृहनिर्माण विभागाने दि.१६.८.२०१० रोजी निर्गमित केलेल्या शासन निर्णयामधील तरतुदीनुसार प्रस्तावाची छाननी करुन अंतिम ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्यासाठी प्रस्ताव वेळेत सादर करावा. कार्यकारी अभियंता व उपमुख्य अभियंता यांनी प्रमाणित केलेल्या भाडेकरु/रहिवाश्यांच्या यादीवर जर रहिवाश्यांचे कांही आक्षेप आल्यास त्याची शहानिशी करण्यांत यावी व यादीमध्ये कांही फेरफार करण्याची आवश्यकता असल्यास प्रस्ताव पुन्हा संबंधित उपमुख्य अभियंता यांचेकडे पूर्तता करण्यासाठी पाठविण्यांत यावा. परत पाठविलेला प्रस्ताव संबंधित उपमुख्य अभियंता व कार्यकारी अभियंता यांनी पूर्तता करुन कमाल १५ दिवसांचे आंत प्रस्ताव पुन्हा निवासी कार्यकारी अभियंता/दुवपु यांचेकडे सादर करावा.

६. निवासी कार्यकारी अभियंता/दुवपु मंडळ यांनी प्राप्त झालेला प्रस्ताव कमाल ४५ दिवसांत वरिष्ठ अधिका-यांकडे मंजुरीस्तव सादर करावा.

सर्व संबंधित अधिका-यांनी वर नमूद कार्यपध्दतीचे तंतोतंत पालन करावे. सदर कार्यपध्दती तात्काळ अंमलात येईल.

सही/-
मुख्य अधिकारी,
मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ

**प्रतः-**

१.मा.उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी/प्राधिकरण यांना माहितीसाठी सविनय सादर.

२.मुख्य अभियंता-१,२,३/प्राधिकरण यांना माहितीसाठी रवाना.

३.सचिव प्राधिकरण यांना त्यांचे पत्र क्र.प्राधि/विनिनि/२०१२/३०/प्र दि.२.१.२०१३ न्वये माहितीसाठी रवाना.

४.उपमुख्य अभियंता,संगणक कक्ष यांना सदर परिपत्रक वेबसाईटवर प्रसिध्द करण्यासाठी रवाना

५.मुख्य जनसंपर्क अधिकारी/प्राधिकरण यांना परिपत्रकास व्यापक प्रसिध्दी देण्यासाठी रवाना.

**<u>प्रति:-</u>**

१.सहमुख्य अधिकारी/दुवपु मंडळ
२.उपमुख्य अभियंता,परिमंडळ-१,२,३,४
३.निवासी कार्यकारी अभियंता/दुवपु मंडळ यांना माहिती
४.कार्यकारी अभियंता,अे,बी-१,बी-२,सी-१,सी-२,सी-३,डी-१,डी-२,डी-३,ई-१,ई-२,ग/दक्षिण, फ/दक्षिण, ग/उत्तर, फ/उत्तर. विभाग.
५.मुख्य लेखाधिकारी/दुवपु मंडळ
६.उप अभियंता-१,२,३, निवासी कार्यकारी अभियंता/दुवपु यांचे कार्यालय
७.सर्व शाखा अभियंता,निवासी कार्यकारी अभियंता/दुवपु यांचे कार्यालय
८. परिपत्रक नस्ती क्र.४८

**सर्व संबंधित अधिका-यांना निर्देश देण्यांत येते की, त्यांनी सदर परिपत्रक सर्व संबंधितांच्या नजरेस आणून द्यावे व परिपत्रकास प्रसिध्दी देण्यांत यावी.**

**<u>सादरः-</u>**

विषयः- मुंबई शहरांतील उपकर प्राप्त इमारतींच्या पुनर्विकासासाठी विकास नियंत्रण नियमावली ३३ (७)अंतर्गत प्राप्त होणारे प्रस्ताव स्विकारण्याची कार्यपध्दती.

**संदर्भः-१.**मा.उपाध्यक्ष तथा मुकाअ/प्रा.यांनी दि.३१.१२.२०१२ व ७.१. २०१३ रोजी झालेल्या विभाग प्रमुखांच्या बैठकीत दिलेले निर्देश.
२.सचिव/प्राधिकरण यांचे पत्र जा.क्र.प्राधि/विनिनि/२०१२/३०/प्र, दि.२.१.२०१३

******

कृपया सचिव/प्राधिकरण यांचे संदर्भाधिन दि.२.१.२०१३ रोजीच्या पत्राचे अवलोकन व्हावे.

उपरोक्त बाबीवर मा.उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी/प्राधिकरण यांचे अधिपत्याखाली दि.३१.१२.२०१२ व ७.१.२०१३ रोजीच्या झालेल्या विभाग प्रमुखांच्या बैठकीत चर्चा झाली असता, मा.उपाध्यक्ष/प्राधिकरण यांनी असे निर्देश दिले आहेत की, यापुढे विकास नियंत्रण नियमावली ३३ (७)अंतर्गत प्राप्त होणारे पुनर्विकासाचे प्रस्ताव कार्यकारी अभियंता/दुवपु यांचे कार्यालयात न स्विकारता प्राप्त होणारे प्रस्ताव हे मुख्य अधिकारी/दुवपु यांच्या कार्यालयात स्विकारण्यात यावेत. जेणेकरुन प्राप्त झालेल्या प्रस्तावांची विभागवार नोंद तथा माहिती उपलब्ध राहील व प्रस्ताव वेळेत निकाली काढण्यावर नियंत्रण ठेवणे शक्य होईल. सचिव/प्राधिकरण यांनी त्यांच्या संदर्भाधिन पत्राद्वारे यासाठी आवश्यक असणारे परिपत्रक/निर्देश संबंधितांना देण्यांत यावे, असे कळविले आहे.

तरी उपरोक्त बाबतीत निर्गमित करावयाच्या परिपत्रकाचा प्रारुप मसुदा आपल्या अवलोकनार्थ व मान्यतेसाठी सादर.

निवासी कार्यकारी अभियंता,
मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ

मा.मुख्य अधिकारी/दुवपु मंडळ

**D:\REE\Gorde\Circular १३\DCR ३३ (७) Circular F.No.४८.doc**

**मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ, मुंबई**